आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८जानेवारी २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ६५ लाख लाभार्थ्यांना ई-प्रॉपर्टी कार्डचे वितरण

- तंत्रज्ञानाच्या लोकशाहीकरणासाठी केंद्र सरकारनं विविध उपक्रम राबवल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन

- मुंबईत विविध सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांसाठी एकच तिकीट वापरता येणार

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवर ‘मन की बात’द्वारे जनतेशी संवाद साधणार

**<><><><><>**

स्वामित्व योजनेअंतर्गत दिलं जाणारं ई प्रॉपर्टी कार्ड हा केवळ दस्तऐवज नसून आर्थिक सुरक्षेची हमी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्डाचं वितरण आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. स्वामित्व आणि भू आधार या दोन्ही योजना ग्रामीण भारताच्या विकासाचा आधार आहेत, असंही ते म्हणाले. छोट्या गावांना स्वामित्व योजनेच्या होणाऱ्या लाभाबद्दल बोलताना प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री (१९ सेकंद)**

या कार्यक्रमात देशभरातली दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतली ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ठिकठिकाणच्या लाभार्थ्यांशी

दूरस्थ पद्धतीने संवाद साधला. नागपुरातल्या रोशन पाटील या शेतकऱ्याशी बोलताना प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री (४४ सेकंद)**

जमीन मालकाला त्याच्या जमिनीची कायदेशीर सनद मिळवून देणं हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३ लाख १७ हजार गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं आहे. दीड लाखांपेक्षा जास्त गावांसाठी सव्वा दोन कोटी प्रॉपर्टी कार्ड्स तयार करण्यात आली आहेत. राज्यातल्या ६० लाखांहून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्यात विविध ठिकाणी हा लाभार्थ्यांना हे प्रॉपर्टी कार्ड मिळाले.

**<><><><><>**

देशात तंत्रज्ञानावर कोणत्याही विशिष्ट व्यक्तींची मक्तेदारी असू नये, तर ते सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावं, तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण व्हावं, हे उद्दिष्ट ठेवून गेल्या १० वर्षांत केंद्र सरकारने नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला आहे, असं प्रतिपादन केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. मुंबईत पॅन-आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी परिषदेच्या समारोप सत्रात ते आज बोलत होते. देळातल्या विविध तंत्रज्ञानाचा उल्लेख त्यांनी बोलताना केला.

इथेच न थांबता, 'उत्पादनांचा देश' म्हणून उभं राहण्याचं आणि जगासमोरच्या समस्यांवर तोडगा काढण्याचं भारताचं लक्ष्य आहे, असं ते म्हणाले.

त्यापूर्वी ठाण्यात बुलेट ट्रेनसाठी बांधण्यात येणाऱ्या बोगद्याच्या बांधकामाचा आढावा अश्विनी वैष्णव यांनी घेतला. बुलेट ट्रेन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई, ठाणे, सूरत आणि अहमदाबादसारख्या शहरांच्या आर्थिक घडामोडींमध्ये लक्षणीय वाढ होईल, असं वैष्णव या आढाव्यानंतर म्हणाले.

**<><><><>**

मुंबईकरांना लवकरच एकाच तिकिटावर उपनगरी रेल्वे, बेस्ट बस, मेट्रो, मोनो आणि एसटीने प्रवास करता येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत ही माहिती दिली. या उपक्रमामुळे प्रवाशांना केवळ ३०० ते ५०० मीटर चालून सार्वजनिक वाहतूक सुविधेचा लाभ घेता येईल. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जलद आणि सुलभ वाहतूक सेवा देण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**होल्ड देवेंद्र फडनवीस**

यामुळे वाहतुकीचे सुलभीकरण होऊन प्रवाशांचा वेळ वाचेल, वाहतूक व्यवस्थेतले अडथळे दूर होतील. तसंच महसूलवाढीसह सार्वजनिक सेवांचा अधिकाधिक वापर होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून टॅक्सी आणि इतर सेवांसोबत या प्रणालीचे एकत्रिकरण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**<><><><>**

राज्यातल्या जवळपास ४ हजार अपात्र महिलांनी लाडकी बहीण योजनेतून माघार घेतली असल्याची माहिती महिला आणि बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. गेल्या महिन्यात शंभर - दीडशे अर्ज आले होते. तर उर्वरित या महिन्यात आल्याचं तटकरे म्हणाल्या. या महिलांना परत केलेले पैसे विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरले जाणार आहेत. तक्रार प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी सुरू आहे. जानेवारी महिन्याचे पैसे लाभार्थ्यांना २६ जानेवारी पूर्वी दिले जातील, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा एकशे अठरावा (११८) भाग आहे.

हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या तसंच आकाशवाणीचं संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲप वरून प्रसारित केला जाणार आहे. त्याशिवाय हा कार्यक्रम एआयआर न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवरून थेट प्रसारित केला जाणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रारुप लागू करणार असल्याचं शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी म्हटलं आहे. याची अंमलजावणी दोन टप्प्यांमध्ये केली जाईल. त्यानुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीसाठी हे प्रारुप लागू होईल. त्याअनुषंगानं येत्या एक एप्रिलपासून इयत्ता पहिलीचे वर्ग सुरू करण्याची चाचपणी सुरू असल्याचं ते म्हणाले. त्यानंतर २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात उरलेल्या इयत्तांसाठी सीबीएसईच्या प्रारुपाप्रमाणे नवे अभ्यासक्रम केले जाणार आहेत.

**<><><><><>**

इयत्ता १०वी आणि १२ वीच्या परीक्षांसाठी परीक्षा केंद्रांवर इतर शाळा, महाविद्यालयातल्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचे निर्देश राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं दिले आहेत. यासोबतच या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात कॉपीमुक्त अभियानातर्गंत जनजागृती साप्ताह राबवला जाणार असल्याचंही शिक्षण मंडळानं म्हटलं आहे.

<><><><><>

गड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी आणि रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय समिती गठित केल्याची माहिती महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार  यांनी आज  दिली. या समितीने ३१ जानेवारीपर्यंत गडकिल्ल्यांचा आढावा घेऊन ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे त्या ठिकाणांची यादी सादर करावी, १ फेब्रुवारी ते  ३१ मे पर्यंत ही अतिक्रमणं हटवण्यात यावीत, याचा अहवाल शासनाला सादर करावा, त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये याची दक्षता घ्यावी, या समितीची दरमाह बैठक घेऊन मासिक अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

<><><><><>

अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणी रेल्वे पोलिसांनी छत्तीसगडमधील दुर्गमधून एकाला अटक केली आहे.

<><><><><>

अखिल मराठा फेडरेशनच्या तिसऱ्या संमेलनाचं उद्घाटन  आज रत्नागिरीत झालं. महाराष्ट्रातली ७५ मराठा मंडळं या संमेलनात सहभागी झाली आहेत. मराठा मंडळाच्या कार्यात तरुणांनी यायला हवं, स्पर्धा परीक्षा देऊन पुढं जायला हवं असं अखिल मराठा फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश सुर्वे यावेळी म्हणाले.

या संमेलनात डॉक्टर सुरेश हावरे यांना अखिल मराठा समाजभूषण पुरस्कार, इतिहासकार डॉक्टर जयसिंगराव पवार यांना अखिल मराठा समाजरत्न पुरस्कार आणि आधुनिक अभियांत्रिकी विषयातले तज्ज्ञ उमेश भुजबळराव यांना अखिल मराठा समाज गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

<><><><><>

महावितरणचा खांब दारात रोवल्याच्या कारणावरून लातूर जिल्ह्यातल्या वाडीशेडोळच्या सरपंचाला मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी ग्रामसेवाच्या तक्रारीवरून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नव संकल्प शिबीर शिर्डीमध्ये सुरू आहे. एकजुटीच्या जोरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जनसेवेचा नवा अध्याय लिहिल असा विश्वास पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी व्यक्त केला.

सरपंच हत्या प्रकरणी टीकेचे धनी ठरलेले मंत्री धनंजय मुंडे शिबिराला अनुपस्थित होते. यावेळी विधानपरिषद सदस्य सतीश चव्हाण यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

**<><><><><>**

पश्चिम घाट प्रदेशात आढळणारा भीमथडी घोडा ही अश्वाची वेगळी प्रजाती गणली जावी या प्रस्तावाला केंद्रसरकारने मान्यता दिली आहे. बिकानेरच्या राष्ट्रीय अश्व संशोधन केंद्रात डॉ. एस. सी. मेहता यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या शास्त्रीय संशोधनाच्या आधारे भीमथडी घोडा ही देशातली ८वी अश्वप्रजाती ठरली आहे. लहान चणीचा काटक भीमथडी घोडा हे मराठ्यांच्या इतिहासातलं मानाचं पान आहे.

**//<><><><><>//**